# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २२/०१/२०२२ (शनिवार)**

**(सकाळ)**

---

## चोरी

**१) पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत ०३ कि.मी. अंतरावरील रामनगर चनकापुर खापरखेडा येथे २१.०१.२२ चे ०२.०० ते ०२.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ.मंदा शेषराव सपकाळ वय ३९ वर्ष, रा.दहेगाव रंगारी व फिर्यादीची मुलगी या त्यांच्या राहते घरी जात असतांना त्यांनी त्याचे हातातील पिशवी रोडचे बाजुला ठेवुन आपसात गोष्टी करीत होत्या. त्यादरम्यान अज्ञात लाल रंगाचा ॲक्टीवा गाडीचा चालक आरोपीने त्याचे ताब्यातील गाडी त्याचे बाजुला उभी करून व फिर्यादीची नजर चुकवुन त्या अज्ञात ॲक्टीवा गाडी चालकाने फिर्यादीच्या पिशवीत ठेवलेली पर्स नगदी २००/–रू. व १५ वर्षे जुनी वापरती ३ ग्राम सोन्याचे मणी ३ ग्राम सोन्याचे डोरले व ३ ग्राम सोन्याची दांडा असलेली असे एकुण ९ ग्राम ची सोन्याची गळसोडी किंमती १५,०००/– रुपयाचा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार जळते मो.नं. ९६७३८३७००७ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :– अंतर्गत ०३ कि.मी. अंतरावरील मौजा टाकळघाट ते कान्होलीबारा रोड पार्कींग परीसर येथे दिनांक २१/०१/२२ चे रात्री ०२.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– दिलशाद वल्द जाहीद अन्सारी वय २२ वर्ष, रा. कोन्डराडीह पोस्ट चोपनाडीह झारखंड एचआर– ५५/एडी– ६५० तसेच सोबत असलेल्या कन्टेनर क्र एचआर– ६९/सी– ५७८६ या दोन्ही क्रमांकाच्या गाडया एमआयडीसी बोरी येथील टाकळघाट कान्होलीबारा रोड पार्कींग परीसर मध्ये लावल्या होत्या. दि २१/०१/२०२२ रोजी मध्यरात्री झोप उघडल्याने त्याच्या कन्टेनरच्या बाजुला एक पांढरे रंगाची कार ज्यामध्ये तीन ते चार इसम जातांना दिसले. त्यावेळी काही बोलण्याच्या आधीच ते निघुन गेले. फिर्यादी आजुबाजुला पाहीले असता डिझेल टॅकचे झाकन खाली पडलले दिसले. यातील अज्ञात आरोपीने १४० लिटर एकुण किमंत २९,५३५/– रुपयाचा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार तरमळे मो. ९९२३६९९१८५ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

**पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील मौजा लक्ष्मीबाई शाळे समोर पारश्विनी येथे दिनांक २१/०१/२०२२ चे १६.४५ वा. दरम्यान आरोपी मृतक चालक नामे – रविन्द्र लक्ष्मण भलावी, वय ४५ वर्ष, रा. नयाकुंड याने आपले ताब्यातील पॅशन प्रो. मोटार सायकल क्र. डी–४०/इज– ७६७८ ह्यगयीने व निष्काळजीपणे चालवुन गाडी वरील नियंत्रण सुटल्याने राणी लक्ष्मीबाई शाळे समोर मोटारसायकलची धडक रोडचे डिव्हायडर चे स्टेटलाईमध्ये मीटर पेटीला मारल्याने तो रोडवर पडुन त्याचे डोक्याला गंभीर मार लागल्याने तो स्वताच्या मृत्युस कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रविन्द्र लक्ष्मण भलावी, वय ४५ वर्ष, रा. नयाकुंड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादंवी. सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री नागुलवार मो.क्र ९९२३३७२६४७ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

**१) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत २० कि.मी. अंतरावरील वलनी गावाजवळ येथे दिनांक १३/०१/२०२२ चे ०६/०० वा ते ०७/०० वा. दरम्यान **नंदकिशोर गजानन सहारे (मृतक),वय ३२ वर्ष, रा. वलनी पो.स्ट मुर्ती** हा काटोल वरून वलनी गावाकडे जात असतांना वलनी गावाजवळ त्याची मोटरसायकल स्लीप झाल्याने डोक्याला आणि नाकाला मार लागला. तो जखमी झाल्याने त्यास गावातील लोंकानी उपचाराकरीता ग्रामीण रूग्णालय काटोल येथे नेले असता तेथुन नागपुर येथे रेफर केल्याने नागपुर न्युरॉन हॉस्पीटल धंतोली येथे उपचारादरम्यान त्याचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विवेक गजानन सहारे वय ३४ वर्ष, रा. वलनी पो.स्ट मुर्ती यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस हवालदार गौरव आगरकर मो.नं. ८४२१७५५८४९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. पारशिवनी** :– दिनांक २०/०१/२२ चे २०.३० वा. दरम्यान **स्वप्निल गुनवंत खेरगडे (मृतक),वय २४ वर्ष रा. मसाळा ता.कामठी** हा त्याचे एम.एच–४०/सी.एफ– २८९१ क्रमांकाच्या होंडा युनिकॉर्न मोटरसायकलने एकटा जात असतांना मौजा डुकरीकला रेल्वे लाईन जवळ अचानक मोटरसायकल समोर कुत्रा आडवा आल्याने तसेच टर्निंग असल्याने त्याचे संतुलन बिघडुन सिलपाट सीमेंट पोलला धडक लागली. त्यास उपचाराकरीता सरकारी दवाखाना कामठी येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गंगाधर नत्थुजी शेलार, वय ३९ वर्ष, रा. डुमरीकला ता.पारशिवनी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस हवालदार फिरोज शेख मो. क्र. ९४२०२५३५०४ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर